

विधान सभा

महाराष्ट्र

# निलेश ज्ञानदेव लंके

सदस्य, विधानसभा महाराष्ट्र
२२४ पारनेर-नगर मतदार संघ

संपर्क कार्यालय न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी, पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
एल.आय.सी. ऑफीस समोर, ईगलप्राईड, बुरुडगांव रोड, अहमदनगर पिन ४१४००१ मो.९८२२५१५२५८
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com

**आ.का.पारनेर/**

**दिनांक : १८/०९/२०२३**

प्रति
मा.ना.श्री.गिरीश महाजन साहेब,
मंत्री, ग्रामविकास विभाग व पर्यटन,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई-३२.

विषय -:खालील रस्त्यांच्या कामांना लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत मंजुरी मिळणे बाबत

आदरणीय दादा ,

वरील विषयान्वे माझ्या पारनेर- नगर मतदारसंघातील खालील रस्त्यांच्या कामांना लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत चालू वर्षात मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्यात यावा.हि विनंती.

| अ.क्र | कामाचे नाव | किमत |
|---|---|---|
| १ | नगर- कल्याण हायवे ते नेप्ती ग्रा.मा-८८ रस्ता सुधारणा करणे.ता.नगर | ७५.०० लक्ष |
| २ | देहरे ते पांढरेवस्ती ग्रा.मा-२११ रस्ता सुधारणा करणे.ता. नगर | ५०.०० लक्ष |
| ३ | वाडेगव्हाण ते मावळेवाडी ग्रा.मा-१०४ रस्ता सुधारणा करणे.ता.पारनेर | ७५.०० लक्ष |

सस्नेह धन्यवाद!

आमदार निलेश ज्ञानदेव लंके

आपला स्नेहाकित

(निलेश ज्ञानदेव लंके)

जि.प. अहमदनगर

**सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखाशिर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पुल परिरक्षण कार्यक्रम अंतर्गत गट-ब मधील कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**शासन निर्णय क्र. जिपर-०१२३/प्र.क्र.३१३/बांध-३**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
**दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०२३**

**संदर्भ:** १) शासन निर्णय,ग्रा.वि. व ज.सं. विभाग, क्र. जिपर-२०१२/प्र.क्र.११८/पं.रा-८, दि.१०/०९/२०१२
२) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग,क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक, दि. ३१.१२.२०२०
३) शासन शुध्दीपत्रक, ग्राम विकास विभाग,क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक, दि. १५.०१.२०२१
४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. जिपर-०१२३/प्र.क्र.३१३/बांध-३, दि.३१ ऑक्टोबर, २०२३
५) जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे दि.२७.१०.२०२३ रोजीचे प्रस्ताव

**शासन निर्णय :-**

राज्यातील जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत निधी मंजूर करण्यात येतो.

जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या संदर्भाधीन क्र.५ येथील प्रस्तावांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद अहमदनगर करिता गट (ब) मधील रु.६००.०० लक्ष (अक्षरी सहाशे लक्ष फक्त) किंमतीच्या कामांस सोबतच्या परिशिष्ट क्र. १ व २ अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात येत असून ही मंजूरी खालील अटींचे पूर्णत: अनुपालन होण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम योजनेचा निधी जिल्हा परिषदांना वितरणासाठी LPRS (Liability Payment Register System) प्रणाली संदर्भाधीन क्र.२ येथील परिपत्रकान्वये सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे सदर कामे पूर्ण झाल्यानंतर कामांची देयके LPRS (Liability Payment Register System) प्रणालीद्वारे अदा करण्यात येतील. सदर कामांवरील देयके LPRS (Liability Payment Register System) प्रणालीद्वारे अदा करण्यात येणार असल्याने निविदा प्रकियेसाठी कोणत्याही निधीच्या तदतूदीची आवश्यकता नाही. त्यामुळे मंजूर करण्यात येणाऱ्या कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करण्यात यावी.

२) कार्यक्रमास प्रदान केलेली मंजूरी ही संवर्गनिहाय, कामनिहाय व किंमतप्रधान आहे. त्यामुळे अंतिम खर्च हा मंजूर किंमतीच्या मर्यादेतच राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

३) गट अ, ब, क आणि ड यामध्ये अंतर्गत पुर्नविनियोजन आवश्यक असल्यास तसे प्रस्ताव या विभागाच्या दिनांक १०.०९.२०१२ च्या शासन निर्णयासोबतच्या तपशीलवार सूचनांच्या परि. १.७ नुसार शासनास सादर करावेत.

४) नव्या कामांच्या निविदा निश्चितीची कार्यवाही एका विभागासाठी एकाच निविदा सूचनेमध्ये सर्व कामांच्या निविदा बोलावून करण्यात यावी.

५) तपशीलवार कार्यक्रम पुस्तिकेच्या शासनाकडील प्रतीवरील जॉब क्रमांक आपल्याकडील प्रतीवर नमूद करावे.

६) सन २०२३-२४ मधील मंजूर कामे याच किंवा लगतच्या आर्थिक वर्षात पूर्ण करावीत. अन्यथा, अशा कामांना त्यानंतर निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. अशी कामे आहे त्या स्थितीत अंतिम करावीत. त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.

७) मागील अनुक्रमांक १,२,३,४,५ व ६ चे काटेकोरपणे पालन करावे. त्यात विचलन झाल्यास संबंधितांच्या गोपनीय अहवालात नोंद घेऊन कडक कारवाई करण्यात येईल.

८) प्रस्तावातील कामे अन्य योजनेत समाविष्ट नाहीत याची खातरजमा तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी करावी. काही कामे दुसऱ्या योजनेतून किंवा कार्यक्रमातून मंजूर आहेत असे आढळल्यास तात्काळ शासनास कळवून मंजूर जॉब क्रमांक रद्द करुन घेणेची कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी करावी. अवर्गीकृत रस्त्यांना जॉब क्रमांक तथा मंजूरी प्राप्त झाल्यास अशी कामे रद्द समजावीत.

९) या मंजूर कार्यक्रमा व्यतिरिक्त कोणतेही काम हाती घेण्यात येवू नये, अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी आपली स्वत:ची वैयक्तिक असणार आहे याची दक्षता घेण्यात यावी.

१०) आपल्या जिल्हा परिषदेस उपलब्ध अनुदान विचारात घेऊन कार्यवाही करावी.

११) या मंजूर कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.१४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार दोषनिवारण दायित्व कालावधीचा निविदेमध्ये समावेश करण्यात यावा.

१२) ठेकेदाराच्या दोष निवारण कालावधीत असलेल्या कामावर सदर कार्यक्रमामधून खर्च करण्यात येवू नये.

१३) या मंजूर कार्यक्रमातील कामाचा वाव जर अन्य कोणत्याही योजनेतील / योजनेतर स्थानिक क्षेत्राकडे वा राज्य क्षेत्राकडे मंजूर कामात समाविष्ट असेल तर तेवढा वाव या मंजूर कार्यक्रमातील कामातून वगळावा.

१४) या मंजूर कार्यक्रमातील रस्त्यांची नांवे, त्यांचा दर्जा, संवर्ग क्रमांक व लांबी रस्ते विकास योजनेप्रमाणे आहे याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी करावी.

**१५) स्थानिक आचारसंहितेचा भंग होणार नाही याबाबत जिल्हा परिषदेने दक्षता घ्यावी.**

१६) कामे सुरु करण्यापूर्वी, कामे प्रगतीत असताना व कामे पूर्ण झाल्यानंतर छायाचित्र (फोटोग्रॉफस्) घेण्यात यावीत व विभागीय कार्यालयाच्या अभिलेख्यांसोबत ठेवावेत.

१७) संरक्षक भिंतीच्या बांधकामातील तरतूदी हया हिल रोड मॅन्युअॅल (Hill Road Manual) प्रमाणे तपासून पहाव्या व त्यानुसार भिंतीचे संकल्पन करावे.

१८) सदर आदेशातील कामे यापूर्वी मंजूर असलेल्या सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील नसल्याची खातरजमा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद यांनी करावी. तसेच काही कामे यापूर्वी मंजूर असल्याचे आढळल्यास सदर कामे शासनाकडून तातडीने बदलून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद यांची राहील.

१९) कामाचे नावातील अंशत: बदल किंवा मंजूर कामाऐवजी नवीन काम / कामे मंजूर करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यापुर्वी जिल्हा परिषदेने मंजूर कामांचा विस्तृत आढावा घेऊन स्वत:ची खात्री करावी. त्यानंतरच कामाचे नावातील अंशत: बदल किंवा मंजूर कामाऐवजी नवीन काम / कामे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव एकाच वेळी सविस्तर कारणांसह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने या विभागास तथा शासनास, कार्यक्रम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत सादर करावा.

२. सदरील खर्च हा मागणी क्रमांक एल-३, ३०५४, मार्ग व पूल, १९६, जिल्हा परिषदा व जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य, (००) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये दळणवळणाच्या मार्गाच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना संप्रयोजन अनुदान, २७, लहान बांधकामे, लेखाशिर्ष ३०५४-२४१९ या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(निलेश ठाकूर)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

२) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता,१/२ , महाराष्ट्र, मुंबई.

३) महालेखापाल, लेखा व परिक्षा, १/२, महाराष्ट्र, मुंबई.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.

५) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.

६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर.

७) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.

८) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग), अहमदनगर.

९) निवड नस्ती (बांध-३) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-१.

परिशिष्ट क्र. १

(शासन निर्णय क्र. जिपर-०१२३/प्र.क्र.३१३/बांध-३, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३)

**गट- ब व गट- क रस्ते व पुल दुरुस्ती, सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता अहमदनगर जिल्हा स्थानिक क्षेत्राचा अद्ययावत मंजूर कार्यक्रमाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

(किंमत रु.लाखात)

| अ. क्र. | सर्वसाधारण दुरुस्तीचा प्रकार गट व उपशिर्ष | नवीन कामे | |
|---|---|---|---|
| | | कामांची संख्या | अंदाजित किंमत |
| १ | ब - १० रस्त्यांची विशेष दुरुस्ती/सुधारणा | १५ | ६००.०० |
| २ | ब - ११ डांबरी नुतनीकरण | | |
| ३ | ब - १२ थेट रस्ते नुतनीकरण | | |
| ४ | ब - १३ थेट रस्ते सुधारणा | | |
| ५ | ब - १४ खडी नुतनीकरण | | |
| ६ | ब - १५ रुंदीकरण | | |
| ७ | ब - १६ कोकण - मराठवाडा विदर्भ विकास कार्यक्रमातील कामे | | |
| | **एकूण ब संवर्गाची कामे** | | |
| ८ | क - १७ अपघात प्रवण क्षेत्रांची सुधारणा | | |
| ९ | क - १८ अपघातप्रवण क्षेत्रांची सुधारणा वगळून अन्य अभियांत्रिकी सुधारणा | | |
| १० | क - १९ कमकुवत /मोठया पुलाची दुरुस्ती/मजबुतीकरण | | |
| ११ | क - २० मुरुमी रस्त्यांचे खडीकरण | | |
| १२ | क - २१ मोऱ्या व लहान रपटयांची मूळ कामे | | |
| १३ | क - २२ लहान मोऱ्यांची सुधारणा | | |
| १४ | क - २३ शा.नि.दि.१०.९.१२ मधील परिच्छेद ४.३ मधील ५ टक्के मर्यादेतील कामे | | |
| | **एकूण क संवर्गाची कामे** | **०** | **०** |
| | **एकूण ब + क संवर्गाची कामे** | **१५** | **६००.००** |

(निलेश ठाकूर)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट क्र.२**

**शासन निर्णय क्रमांक : जिपर-०१२३/प्र.क्र.३१३/बांध-३, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३**

**लेखाशिर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम अंतर्गत गट-ब व गट-क मधील मंजूर कामांची यादी**

| जिल्हा - अहमदनगर | | जिल्हा कोड - ०१ | | | (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे संक्षिप्त नांव | रस्त्याचा संवर्ग व क्रमांक | अंदाजित किंमत | कामाची सद्यस्थिती | जॉब क्रमांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नगर कल्याण हायवे ते नेप्ती (जपेवस्ती ते नेप्ती मार्ग) रस्ता सा.क्र.०/०० ते १/२०० ता. नगर | ग्रामा ८८ | ७५.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०१९ |
| २ | देहरे पांढरेवस्ती रस्ता सा.क्र. ०/०० ते ३/०० ता. नगर | ग्रामा २११ | ५०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२० |
| ३ | वाडेगव्हाण ते मावळेवाड रस्ता सा.क्र.७/०० ते १०/०० ता. पारनेर | ग्रामा १०४ | ७५.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२१ |
| ४ | हातवळण ते बनप्रिपी रस्ता सा.क्र.०/०० ते २/०० ता. नगर | ग्रामा २९८ | ३०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२२ |
| ५ | प्रजिमा-५९ ते पवारवाडी रस्ता सा.क्र.०/०० ते ३/५०० ता. श्रीगोंदा | ग्रामा ३३७ | २५.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२३ |
| ६ | नवलेवाडी ते सारोळा सोमवंशी रस्ता सा.क्र. ०/०० ते २/०० ता. श्रीगोंदा | ग्रामा ७८ | २५.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२४ |
| ७ | रामा-६७ ते भांबवस्ती रस्ता सा.क्र.०/०० ते १/५०० ता. श्रीगोंदा | ग्रामा २४१ | ४०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२५ |
| ८ | माठ वडाची वाडी रस्ता सा.क्र.०/०० ते १/०० ता. श्रीगोंदा | ग्रामा ३४५ | ४०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२६ |
| ९ | धारगांव ते ढोरजा रस्ता सा.क्र.०/०० ते ३/०० ता. श्रीगोंदा | ग्रामा १०४ | ४०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२७ |
| १० | बांगरवस्ती पिंपळगाव टप्पा ते गिरवाडी रस्ता सा.क्र.०/०० ते ३/०० ता. पाथर्डी | ग्रामा ७० | ५०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२८ |
| ११ | शेकट ते शेकट फाटा रस्ता सा.क्र.०/०० ते ३/०० ता. पाथर्डी | ग्रामा २०० | ४०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०२९ |
| १२ | जाटदेवळे ते आठरेवस्ती रस्ता सा.क्र.०/०० ते २/०० ता. पाथर्डी | ग्रामा १०४ | २०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०३० |
| १३ | जाटदेवळे ते आठरवाडी रस्ता सा.क्र. ०/०० ते २/०० ता. पाथर्डी | ग्रामा १०५ | २०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०३१ |

| अ.क्र. | कामाचे संक्षिप्त नांव | रस्त्याचा संवर्ग व क्रमांक | अंदाजित किंमत | कामाची सद्यस्थिती | जॉब क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १४ | एरंडगाव धस ते ब्रीज वस्ती रस्ता सा.क्र.१/०० ते ३/०० ता. शेवगाव | ग्रामा २ | ४०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०३२ |
| १५ | शेवगाव रस्ता ते आपेगाव रस्ता सा.क्र.१/०० ते ३/५०० ता. शेवगाव | ग्रामा ४४ | ३०.०० | नवीन काम | २३/०१/०१/१०/०३३ |
| **गट ब संवर्गातील एकूण कामांची रक्कम** | | **रुपये** | **६००.००** | **लक्ष** | |

(निलेश ठाकूर)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**